# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२११/२०२४**
**बोर्ड क्र.०८**

श्रीमती सिंधूताई भिमरव काकडे,
रा. अकबर रोड, लाकडी मशिन समोर,
एम.आय.डी.सी. रोड, आष्टी,
ता. आष्टी, जि. बीड-४१४२०३ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.१२.२०२३ | माझा तारीख १४.०२.२०२३ च्या अर्जावर काय कार्यवाही झाली त्याबद्दल माहिती मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागवलेली माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय किंवा अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन

दिली किंवा कसे हे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---8638--- दिनांक :- 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४१०६/२०२४ व ४१०७/२०२४**
**बोर्ड क्र.०९ व १०**

श्री. संजय बालासाहेब वाघमारे,
रा. संत रविदास नगर, चनई रोड,
ता. अंबाजोगाई, जि. बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दोन्ही जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०२.२०२४ | सन २०२२-२३ ते आजतागायत या कालावधीतील सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई अंतर्गत चालू असलेल्या कामाची माहिती मिळणेबाबत. |
| ०६.०२.२०२४ | सन २०२२-२३ ते आजतागायत या कालावधतील अंबाजोगाई उपविभाग अंतर्गत शासकीय अनिवासी व निवासी इमारती देखभाल दुरुस्ती कामांची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन

निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याच्या नाराजीने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी दोन्ही द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8639 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४४११/२०२४**
**बोर्ड क्र.११**

श्री. वेदांत भागवतराव शितोळे, — अपिलार्थी
रा. तट बोरगांव, ता. अंबाजोगाई, जि. बीड-४३१५१७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड

**(ऑनलाईन सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थी यांचा वैद्यकीय अडचणी मुळे प्रत्यक्ष सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही, तथापि ऑनालईन (गुगल मीट ) घेण्यावी यावी अशी त्यांनी विनंती केली होत त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.१२.२०२३ | सन २०२१ ते माहिती देईपर्यंत या कालावधीतील अंबाजोगाई तालुक्यातील सोमनाथ बोरगाव धानोरा तट बोरगाव रस्ता इजिम (ओ डी आर)१३६ तट बोरगाव गावाजवळील मांजरा नदीवरील मोठया पुलाच्या बांधकामाची एकूण आठ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी ऑनलाईन सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज ऑनलाईन सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी व्यापक व विस्तृत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8640 दिनांक : 22/07/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५८२/२०२४**
**बोर्ड क्र.१२**

श्री. रजियोद्दिन जकीयोद्दिन इनामदार, — अपिलार्थी
रा. कळंब रोड केज, ता. केज, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि.बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०१.२०२४ | केज शहरात सर्वे नं.आठ मध्ये शासकीय निवासस्थाने (क्वार्टर्स)चे बांधकाम करण्यात आलेले आहे हे बांधकाम ज्या आदेशानुसार व परीपत्रकानुसार करण्यात आलेले आहे त्याबाबतच्या सर्व कागदपत्रांची प्रत्येकी एक प्रत देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती किंवा आदेश मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि.बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत डाकेव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि.बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8641 दिनांक :- 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४९५०/२०२४ व ४९५१/२०२४**
**बोर्ड क्र.१३ व १४**

श्री. शेख शाहेर झाकीर अहमद, ... अपिलार्थी
रा. नेकनूर, ता. व जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, ... : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा ... : उत्तरवादी क्र.२
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०१.२०२४ | सन २०२१-२२ पर्यंत आपल्या कार्यालयामार्फत शहर बीड येथील नगर परिषद हद्दीतील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती अंतर्गत बीड शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ता व नाली सुधारा योजना ता जि बीड (१५ कामे) करिता सन २०२१-२२२ मध्ये करण्यात आलेले १५ कामासाठी शिताई / **Shitai Construction Beed** ला किती निधी वाटप करण्यात आली व इतर दोन मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |
| २५.०१.२०२४ | सन २०२१-२२ पर्यंत आपल्या कार्यालयामार्फत शहर बीड येथील नगर परिषद हद्दीतील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती अंतर्गत बीड शहरातील सिमेंट कॉक्रीट रस्ता व नाली सुधारा योजना ता जि बीड (१५ कामे) करिता सन २०२१-२२ मध्ये करण्यात आलेले १५ कामांची ईस्टिमेटची सविस्तर कागदोपत्री माहिती छायांकित प्रमाणीत प्रत व इतर दोन मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी, सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती तयार आहे. आज रोजी अपिलार्थी यांना देण्यात येईल, असे अश्वासीत केले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिलावर दि.२१.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस १५ दिवसात माहिती उपलब्ध करुनदेण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुदतीत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचा युक्तिवाद व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8642 दिनांक :- 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५८३४/२०२४**
**बोर्ड क्र.१५**

श्री. अमर मोहनराव गायकवाड, — अपिलार्थी
रा. सुकळी, पो. माळेगाव, ता. केज, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.११.२०२३ | मौजे माळेगांव ते लोखंडी सावरगांव डांबरी रस्त्याची सर्व माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीच माहिती पुरविली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8643 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५८४४/२०२४**
**बोर्ड क्र.१६**

श्री. सुशिल दत्तात्रय गायकवाड, — अपिलार्थी
रा. क्रांतिनगर, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०३.२०२४ | लोकशाही आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती अंबाजोगाई शहरामध्ये सुधारणा या योजने अंतर्गत सन २०२२-२३ या वित्तीय वर्षामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई यांच्याकडून करण्यात आलेल्या विविध विकास कामाचे नाव तसेच त्या कामास मंजूर करण्यात आलेली काम निहाय रक्कम याची वरील विवरण निहाय माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती मुदतीत न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय किंवा अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे हे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8644 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५९९८/२०२४**
**बोर्ड क्र.१७**

श्री. अशोक किसन सुरवसे, — अपिलार्थी
रा. धांडे गल्ली, बीड, ता.जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०१.२०२४ | आपल्या कार्यालयाअंतर्गत २०२० ते २०२३ या काळात झालेल्या कामांची हेड निहाय साक्षांकित यादी तसेच संबंधीत उप अभियंता यांचा दौरा रजिस्टर तसेच लॉगबुकच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी अनेक मुद्याची माहिती विस्तृत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या

प्रथम अपिलावर दि.०७.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, एकाच माहिती अर्जात दोन वेगवेगळया विषयाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन ती एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलाथी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

१. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-----8645------ दिनांक :-22/07/2025---

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५९९९/२०२४**
**बोर्ड क्र. १८**

श्री. अशोक किसन सुरवसे, — अपिलार्थी
रा. धांडे गल्ली, बीड, ता.जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०५.२०२४ व दि.२९.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०१.२०२४ | भूमी अभिलेख अधिक्षक कार्यालय बीड या इमारतीच्या कलर कामाचे अंदाजपत्रक, कार्यारंभ आदेश, कामपुर्णत्वाचा दाखला, देखभाल दुरुस्तीचा कालावधी वरील सर्व माहिती साक्षांकित प्रतीत देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती तयार आहे, अपिलार्थीस देण्यात येईल असे अश्वासीत केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०७.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, १५ दिवसात अपिलकर्त्यास माहिती पुरवावी असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. यावरुनी अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8646 दिनांक : 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७९९१/२०२४**
**बोर्ड क्र.१९**

श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, — अपिलार्थी
रा. घर नं.१०/८, गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकुंदनगर),
औरंगाबाद रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग,
बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०५.२०२४ | आपल्या कार्यालयातील कार्यरत असलेले उप विभागीय अभियंता यांनी आपल्या कार्यालयात हजर झाले असून आज रोजीपर्यंत सादर केलेले मासिक दैनंदिनीचे साक्षांकित प्रत दयावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.२०.०५.२०२४ रोजीच्या माहिती अर्जान्वये हवी असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन अर्ज निकाली काढावे अशी दि.२४.०६.२०२५ रोजी विनंती केलेली आहे. ते विनंती अर्ज आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.२५.०६.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8647 दिनांक :- 22/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७९९१ ते ७९९३/२०२४-३**
**बोर्ड क्र.१९ ते २१**

श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, — अपिलार्थी
रा. घर नं.१०/८, गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकुंदनगर),
औरंगाबाद रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग,गेवराई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०५.२०२४ | आपल्या कार्यालयातील कार्यरत असलेले उपविभागीय अभियंता यांनी आपल्या कार्यालयात हजर झाले पासून आज रोजीपर्यंत सादर केलेली मासिक दैनंदिनीचे साक्षांकित प्रती दयावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.१०.०५.२०२४ रोजीच्या माहिती अर्जान्वये हवी असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन अर्ज निकाली काढावे अशी दि.२०.०६.२०२४ रोजी विनंती केलेली आहे. ते विनंती अर्ज आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.२०.०६.२०२४ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8648 दिनांक : 22/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७९९३/२०२४**
**बोर्ड क्र.२१**

श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, — अपिलार्थी
रा. घर नं.१०/८, गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकुंदनगर),
औरंगाबाद रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग,
बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०५.२०२४ | आपल्या कार्यालयातील कार्यरत असलेले उपविभागीय अभियंता यांनी आपल्या कार्यालयात हजर झाले पासून आजपर्यंत सादर केलेले मासिक दैनंदिनीचे साक्षांकित प्रति दयावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.१०.०५.२०२४ रोजीच्या माहिती अर्जान्वये हवी असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन अर्ज निकाली काढावे अशी दि.२४.०६.२०२५ रोजी विनंती केलेली आहे. ते विनंती अर्ज आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.२४.०६.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8649 दिनांक : 22/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८३८१/२०२४**
**बोर्ड क्र.२२**

श्री. रमेश भगवान कवडे, — अपिलार्थी
रा. जायकोवाडी, पो. हरकी निमगाव,
ता. माजलगांव, जि. बीड-४३११२९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गेवराई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०६.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२३ पासून आजपर्यंत आपले कार्यालय उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गेवराई येथे दि.०२.०४.२०२४ रोजी अर्ज केला होता, या अर्जावर नमूद केलेली माहिती मला सत्यप्रमाणित करुन नक्कला देण्यात याव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की,अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१९.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून प्रथम अपिली निकाली काढले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्यापपर्यंत कोणतीच माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यवाहीची अपेक्षा केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडुन प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे वजा, स्पष्टीकरण मागणारी इ. माहिती देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीचा अर्ज ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त होतो, त्यावेळी जी माहिती त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत उपलब्ध असते, ती माहिती त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होते. अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिल प्रयोजनात तथ्यांश दिसन येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8650 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८६२८/२०२४**
**बोर्ड क्र. २३**

श्री. रमेश भगवान कवडे, — अपिलार्थी
रा. जायकोवाडी, पो. हरकी निमगाव,
ता. माजलगांव, जि. बीड-४३११२९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गेवराई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०६.२०२४ | दि.०२.०४.२०२४ पासून आजपर्यंत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ब्रीड या आपल्या कार्यालयात दि.०२.०४.२०२४ रोजी तक्रार अर्ज केला होता, या अर्जावर आपल्या कार्यालयाने कोणती कार्यवाही केली या बाबतच्या प्रमाणित नक्कला आवक-जावक क्रमांकासहीत मला देण्यात याव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपिलाकर्ता यांनी त्यांच्या मूळ अर्जामधील नमूद केलेली माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी सदरील तक्रार अर्जाबाबत कारवाई केल्याचे निदर्शनास आले, त्यामुळे अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.००८.२०२४ रोजी घेऊन, अपिलाकर्ता यांनी त्यांच्या मूळ अर्जामधील नमूद केलेली माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी सदरील तक्रार अर्जाबाबत कारवाई केल्याचे निदर्शनास आले, त्यामुळे अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढले असा निर्णय पारित केलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8651 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९५४२/२०२४**
**बोर्ड क्र.२४**

श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, — अपिलार्थी
रा. प्लॉट नं.ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०५.२०२४ | दि.०१.०४.२०२२ ते दि.१७.०५.२०२४ या कालावधीतील एच.ए.एम.च्या कामांची माहिती, विषयाप्रमाणे किंवा शासन विहित नमुण्यात किंवा कार्यालयात उपलब्धतेनुसार किंवा पुढील प्रमाणे १. आपल्या विभागामार्फत चालू व झालेल्या एच ए एम च्या कामांची प्रशासकीय मान्यता सर्व कार्यारंभ आदेशाची छायांकित प्रती कार्यालयीन पत्रासह कार्यालयाच्या शिक्यासह माहिती अधिकारचा विहित नमुण्यातील शिक्का मुद्रित करुन व याप्रमाणे पान क्र व माहिती अधिकारी यांचे स्वाक्षरीत द्यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली

माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

8652

जा.क्र.------------------ दिनांक :- 22/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९९१८/२०२४**
**बोर्ड क्र.२५**

श्री. प्रविण गोकुळ खिळे, — अपिलार्थी
रा. कानडी बुद्रुक, पो. शिराळ, ता. आष्टी, जि.बीड-४१४२०८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे उशिराने उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०४.२०२४ | सन २०२३ ते २०२४ मध्ये कानडी बुद्रुक ते रुई नालकोल रस्त्याची साइड पट्टी वरील दुरुस्ती केलेली आहे का २. कानडी बुद्रुक ते रुई नालकोल रस्ता दुरुस्तीसाठी कोणती कामे केलेली असून सदर काम पुर्ण केल्याचा कालावधी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत व प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. म्हणून ती अपिलार्थी यांना देय होणार नाही. अपिलार्थी यांचे यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8653 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०३७२/२०२४**
**बोर्ड क्र.२६**

श्री. वासुदेव ज्ञानोबा डोंगरे, — अपिलार्थी
रा. बस स्टँड जवळ, केज, ता. केज, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
कनिष्ठ अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०८.२०२४ | मा.आ.सौ. संगिताताई डोंबरे यांचे फंडातून मौजे कोठी ता.केज, ग्रामपंचायत अंतर्गत आलेल्या सिमेंट रस्ता व रोहयो अंतर्गत कोठी ते लव्हारी रस्त्याचे मंजूर सविस्तर अंदाजपत्रकाची साक्षांकित प्रती व संबंधीत कामाच्या आपण पुस्तीकेत घेण्यात आलेल्या नोंदीच्या साक्षांकित प्रती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. तसेच त्यांच्या लेखी युक्तिवादात त्यांनी नमूद केले की, संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व मला नुकसान भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8630 दिनांक : 22/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०५०५/२०२४**
**बोर्ड क्र.२७**

श्री. पठाण नासेर खॉन दौलत खॉन, — अपिलार्थी
रा. राजगल्ली, बुखारी शाळेसमोर, ता. माजलगांव, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०९.२०२४ | इतर जिल्हा मार्ग ५७ कि.मी. ०० से ६०० माजलगाव मजरंच रस्तयाचे जी कॅन्स्ट्रशन कॉपी अंबाजोगाई यांना दिलेले देयक (बीठ) चे मोजमाप पुस्तकाची झेरॉक्स व चेकलिस्ट पेपर चे झेरॉक्स व रॉयल्टीचे पावती व इतर... |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आजपर्यंत माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगांव, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8663 दिनांक :- 23/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -११०६४/२०२४
बोर्ड क्र.२८

श्री. पाटील राजीव दामोधर, अपिलार्थी
रा. हरीभाऊ नगर, कृपासदन रोड, लातूर-४१३५१२

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.३०.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०६.२०२४ | सन २०२२ ते आजतागायत बीड जिल्हयातील सर्व शाखा अभियंता यांनी कोणत्या कोणती कामे केली व कोण कोणती कामे अपुर्ण आहेत. त्याबाबतची एम.बी. च्या प्रती देण्यात याव्यात व ईनिविदा भरलेली संपूर्ण माहिती व सदरील ईनिविदा कोणास देण्यात आले याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे बोध होत नसल्याने आपण कार्यालयीन वेळेत माहितीचे अभिलेख येऊन पहावे व त्या उपलब्ध अभिलेखापैकी आपणास हव्या असलेल्या अभिलेख्यांच्या छायांकित प्रती आपणास सशुल्काचा भरणा करुन पुरविता येतील असे दि.२२.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपिलकर्त्यांने माहितीचे अभिलेखे समक्ष कार्यालयात पहावेत व १५ दिवसांत शुल्कांचा भरणा करुन पुरवाव्यात असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्याप अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी व्यापक, त्रोटक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय आयोगास योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---8664--- दिनांक :-23/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०६८६, १०६८७,२४५३,६८४४,
६८४५,७०२१,७०२२,७०२३,
६८७५/२०२४(एकूण ०९)**

**बोर्ड क्र.२९ ते ३८ (अ.क्र.३१ वगळून)**

श्री. कैलास दत्तात्रय दरेकर,
रा. जगदंबादेवी मंदीराजवळ, सायकड गल्ली, आष्टी,
ता. आष्टी, जि. बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.१२.२०२४, २८.०३.२०२४, २७.०६.२०२४, ०४.०७.२०२४ व ०१.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये नऊ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ. क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| २९ | १०६८६/२०२४ | १९.०९.२०२४ | जदगंबा देवी मंदीराजवळ सायकड गल्ली खुंटीफळ ते वाहिरा रस्ता कामांची अंदाजपत्रक तसेच कार्यारंभ आदेश तसेच राजकमल एजन्सीकडे असणाऱ्या आष्टी तालुक्यातील कामांची नावासह यादी साक्षांकित करुन दयावी. |
| ३० | १०६८७/२०२४ | २३.०९.२०२४ | जगदंबा देवी मंदीराजवळ सायकड गल्ली परम कॉम्प्यूटर नोंदणी कुठे करण्यात आलेली, परम कॉम्प्यूटर नोंदणी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | दस्ताऐवज देण्यात यावी, परम कॉम्प्यूटरच्या मालकाचे नाव पत्ता संपक्र क्र. देण्यात यावा व इतर.. | |
| ३२ | २४५३/२०२४ | ११.०१.२०२४ | जगदंबादेवी मंदीराजवळ सायकड गल्ली आष्टी तालुक्यातील बीड नगर रस्ता येथे एअरटेल कंपनीचे ओ एक सी केबल टाकण्यासाठी आपल्या कार्यालयाकडे सादर प्रस्तावाची तसेच भरलेल्या चलनाची संचिका | |
| ३३ | ६८४४/२०२४ | ०१.०४.२०२४ | जगदंबादेवी मंदिराजवळ सायकड मल्लीकार्जून डोंगर किन्ही पिंपळवडी-अमळनेर कामांचे डिटेल अंदाजपत्रक कार्यारंभ आदेश, काम पुर्णत्वाचा दाखला, कामांच्या प्रत्येक लियर वाईज दिनांक निहाय व इतर.. | |
| ३४ | ६८४५/२०२४ | ०१.०४.२०२४ | जगदंबादेवी मंदीराजवळ सायकड गल्ली आपल्याक ार्यालयाचे २०२० ते २०२४ मार्च अखेर पर्यतच्या काळातील लेखापरिक्षण अहवाल तसेच दोष दुरुस्ती अहवाल देण्यात यावा व इतर.. | |
| ३५ | ७०२१/२०२४ | ०१.०४.२०२४ | जगदंबादेवी मंदिराजवळ सायकड गल्ली नगर बीड-१६ नंबर हायवेवर झालेल्या फर्निचर कामाचे अंदाजपत्रक कार्यारंभ आदेश, काम पुर्णत्वाचे दाखले, सदर कामाचे देयके अदा केले असल्यास मोजमाप पुस्तीकांच्या प्रती साक्षांकित देण्यात याव्यात. | |
| ३६ | ७०२२/२०२४ | २०.०३.२०२४ | जगदंबादेवी मंदिराजवळ सायकड गल्ली हॅम योजनेतून सुरु असलेल्या राजुरी ते चिचपूर ४४ कि.मी. रस्त्याकामाचे अंदाजपत्रक तसेच कार्यारंभ आदेश, काम पुर्णत्वाचा दाखला व इतर.. | |
| ३७ | ७०२३/२०२४ | १९.०३.०२४ | जगदंबा देवी मंदिराजवळ सायकउ गल्ली सन २०२० त-२०२१ते २०२२-२३ या काळात आपल्या कार्यालयाकडून सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना दिलेल्या कामांची नावासह यादी व इतर.. | |
| ३८ | ६८७५/२०२४ | ०१.०४.२०२४ | जगदंबादेवी मंदिराजवळ सायकड गल्ली जा.क्र./सा.बां.वि.-II बीड/तांशा/१२६८ दि.३० जानेवारी २०२३ उपविभागीय अभियंता आली यांना काढलेल्या तसेच उपविभागीय अभियंता पाटोदा यांना काढलेल्या व इतर.. | |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली असल्यामुळे संबंधित विभागाना पत्र व्यवहार केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली

नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची अनेक विषयाशी संबंधित आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२, बीड यांनी अपिलार्थी यांच्या नऊ जोडपत्र अ मध्ये वर नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली **प्रती माहिती अर्ज** ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहिती आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे नऊ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 8655 दिनांक : 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २४४४/२०२४**
**बोर्ड क्र.३१**

श्री. कैलास दत्तात्रय दरेकर, — अपिलार्थी
रा. जगदंबादेवी मंदिराजवळ सायकड गल्ली, आष्टी,
ता. आष्टी, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शिरुर कासार, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.०२, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.१२.२०२३ | सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शिरुर, का., अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक वस्तीगृहाच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक (पुर्ण) डिल्स कार्यारंभ आदेश, कामपुर्णत्वाचा दाखला, तसेच प्रमुख जिल्हा मार्ग १६ ठकळी, बारगणवाडी-पिंपळणेर हिंगोली-सिंदफणा खड्डे बुजवण्याच्या कामाचे कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक साक्षांकित देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन

निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शिरुर कासार, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.०२, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8654 दिनांक : 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६९९१ /२०२४**
**बोर्ड अ.क्र.३९**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — :उत्तरवादी क्र.१
नियोजन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.२
जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी ०३.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ३९ | ६९९१/२०२४ | २६.०२.२०२४ | सन २०२३-२०२४ या कालावधीतील जिल्हा नियोजन समितीने आराखडयानुसार मंजूर असलेल्या ४०९ कोटी ८ लाख रुपयाचे खर्च विवरण पत्र देण्यात यावे, प्रशासकीय मान्यतेच्या छायांकित प्रत देण्यात यावे. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची मागणी केल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक

प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका वउद्दिष्ट सफल होत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9991 दिनांक : 14.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६९९२/२०२४**
**बोर्ड अ.क्र.४०**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, सामान्य-१,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, सर्वसाधारण,जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार सर्वसाधारण श्रीमती तेजस्वीनी जाधव उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४० | ६९९२/२०२४ | २६.०२.२०२४ | महासंस्कृती महोत्सव बीड साठी खर्च केलेल्या निधींचे विवरण पत्र पावत्यासहित मिळणेबाबत.तसेच प्रचार व प्रसार, निमंत्रण पत्रीका, बॅर होर्डींग्ज, कलाकार मानधनसह ईतर गोष्टीची परिपुर्ण माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३०.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांचे अर्जातील नमूद व संकलनात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना तात्काळ देण्यात यावी, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये,

माहिती दडवून ठेवत माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.०५.२०२४ रोजी पारित केलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची अयोगास आवश्यकता दिसून येत नाही.अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सामान्य-१,जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10002 दिनांक : 14.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६९९३/२०२४**
**बोर्ड अ.क्र.४१**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी ०३.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४१ | ६९९३/२०२४ | २६.०२.२०२४ | सन २०१७ ते २०२४ या कालावधीतील वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेस शासनाकडून व जिल्हाधिकारी बीड यांचेकडून प्राप्त प्रशासकीय मान्यतेच्या छायांकित प्रती मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विस्तृत व्यापक व मोठया कालावधीची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9992 दिनांक :- 14.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६९९६/२०२४ व ६९९९/२०२४**
**बोर्ड अ.क्र.४२ व ४५**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : प्रतिवादी क्र.२
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बां.), उपविभाग, जि.प.बीड, श्री. चोपडे संजीव श्रीपतराव व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (बां.), विभाग, जि.प.बीड, श्री. मोमीन सय्यद शकील अहमद उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे दोन माहिती अर्जान्वये माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४२ | ६९९६/२०२४ | २९.०२.२०२४ | जि.प. बीड मधील अभिलेख कक्ष स्थापन करण्यात आला असून त्यावर केलेल्या खर्चाचा तपशील संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे. |
| ४५ | ६९९९/२०२४ | २९.०२.२०२४ | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. बीड यांचे निवासस्थान दुरुस्तीस दिलेल्या प्रशासकीय मान्यता कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक इ. निवीदा, प्रणालीची छायांकित प्रती मिळणेबाबत केलेल्या खर्चाचे विवरण पत्र. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची म्हणजे ४००० प्रती होतील. त्यामुळे कलम ७(९) अन्वये कार्यालयीन दिवशी/ वेळेत या प्राधिकरणात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करुन आवश्यक माहितीसाठी शुल्काचा भरणा केल्यानंतर आपणास माहिती देण्यात येईल असे दि.०३.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिलावर दि.२९.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दृष्ट हेतू समोर ठेवून माहिती देण्यास जाणीवपुर्वक विलंब करत माहिती दडवून ठेवत माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. या ठिकाणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिलावर दि.२९.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन,अर्जदार यांना अवलोकनाची संधी देऊन शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9993 दिनांक : 14.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६९९७/२०२४
बोर्ड .अ.क्र.४३

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर पालिका, प्रशासन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका, प्रशासन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. अजित गणपत ढोपे, मुख्याधिकारी,केज, नगर पंचायत, जि. बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/तपशिल |
|---|---|---|---|
| ४३ | ६९९७/२०२४ | २९.०२.२०२४ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत केज नगर पंचायत यांना दिलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या छायांकित प्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०२.०७.२०२४ रोजी ई-मेल द्वारे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांना दि.०२.०७.२०२४ रोजी १.५४ P.M. प्राप्त झालेला आहे. ते पत्र आयोगास सादर केले.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास विलंब करत टाळाटाळ करत आहेत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०२.०७.२०२४ रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9994 दिनांक : 14.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक, ६९९८, १०७४५ व १०७४६/२०२४**
**बोर्ड अ.क्र.४४, ५९ व ६०**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : प्रतिवादी क्र.१
उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
नगर परिषद कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : प्रतिवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी ०३.०७.२०२४ व १२.०१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सा.बांधकाम विभाग, न.प.बीड, श्री. किरण देशमुख व प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, न.प. बीड, श्रीमती नीता अंधारे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये तीन माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४४ | ६९९८/२०२४ | ११.१२.२०२३ | मा. मुख्यमंत्री विशेष निधी अंतर्गत बीड शहरात सिमेंट कॉक्रीट रस्ते व पक्की नाली बांधकाम सारडा कन्स्ट्रक्शन यांनी केले असून त्याचे मोजमाप पुस्तीका मिळणेबाबत. |
| ५८ | १०७४४/२०२४ | ११.०३.२०२४ | मा. जिल्हाधिकारी बीड यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.७ दि .३१.०३.२०२३ अन्वये नगर परिषद बीड अंतर्गत अग्निशामन साहित्य खरेदी करणेबाबत अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तीका, साहित्य खरेदी दरपत्रक, इ-निविदा याची परिपुर्ण माहिती मिळणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६० | १०७४६/२०२४ | ११.०३.२०२४ | दि.२१ मार्च २०२३ रोजी जिल्हाधिकारी बीड यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साई नागरी वस्त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी ३२ कामांना मंजूरी प्र.मा. दिली असून संबंधीत कामाचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तीका व निविदा, वर्क ऑर्डर, काम पुर्णत्वाचा दाखल मिळणेबाबत, सहाय्यक आयुक्त यांचे प्रमाणपत्र देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती ३२ कामांना मंजूरी दिलेली आहे. सदरील माहिती ही व्यापक व विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. अपिलार्थी हे सतत माहितीचे अर्ज करित असतात.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीन्ही प्रथम अपिलावर दि.०६.०६.२०२४ व दि.०८.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास जाणीवपुर्वक टाळाटाळ व सुनावणी घेण्यास विलंब, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या तिन्ही प्रथम अपिलावर दि.२१.०५.२०२४ व दि. ०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना ०७ व १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तीन्ही प्रकरणात दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नगर परिषद कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या तीन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-9995- दिनांक :-14082025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४४२०/२०२४ व ८७७३/२०२४**
**बोर्ड अ.क्र.४६ व ४९**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : प्रतिवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.०२, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : प्रतिवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०४.२०२४ व दि.३०.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.०२, बीड, श्री. एम.के. कादरी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४६ | ४४२०/२०२४ | ११.१२.२०२३ | सन २०१८ ते २०२३ रस्ते, इमारत सह विविध, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ बीड यांना शासनाकडून दिलेल्या व जिल्हाधिकारी बीड यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यता यांच्या छायांकित प्रत मिळणेबाबत. |
| ४९ | ८७७३/२०२४ | २०.०५.२०२४ | सा.बां.वि.क्र.२ बीड यांना शासनाकडून प्राप्त प्रशासकीय मान्यता, जिल्हाधिकारी, बीड यांचेकडून प्राप्त प्रशासकीय मान्यता दोन्हची अंदाजपत्रक, प्र.मा. प्रमाणे कामाचा संध्यस्थिती अहवाल व कार्यारंभ आदेश यांच्या छायांकित प्रत मिळणेबाबत. व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०५.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, कार्यालयात समक्ष येवून माहिती पाहू शकता आणि उपलब्ध माहितीच्या अभिलेख्यापैकी आवश्यक नेमक्याच हव्या असलेल्या अभिलेख्यांच्या छायांकित प्रती विहीत शुल्काचा भरणा केल्यास माहिती पुरविता येईल असे कळविले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणीवपुर्वक माहिती देण्यास विलंब करत टाळाटाळ केली जात आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. नेमका संदर्भ नमूद केलेला नाही.

अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने योग्य प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्याश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त अपिलार्थी यांचे दोन द्वितीय निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 9996 दिनांक :- 14.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८१७३/२०२४**
**बोर्ड अ.क्र.४७**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग, बीड, श्री. सी. पी. बोराडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.बीड, श्री. आर. पी. तोंडे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४७ | ८१७३/२०२४ | ०५.४.२०२४ | उप अभियंता श्री बोराडे व सहा. अभियंता भागवत यांनी रेकॉर्ड केलेल्या मोजमाप पुस्तीकेच्या छायांकित प्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना विहित वेळेत माहिती देता आली नाही. कारण माझ्याकडे सा. बांधकाम उपविभाग बीड व सा. बांउपविभाग वडवणी येथील अतिरिक्त कार्यभार असल्यामेळे. अपिलार्थी हे सतत माहितीचे अर्ज सादर करतात. त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. तथापि अपूर्ण व चुकीची दिली असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल

दाखल करतात.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणीवपुर्वक माहिती देण्यास टाळाटाळ करतात, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपिलकर्त्यास १५ दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहित अधिकारी यांना आदेशीत केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 9990 दिनांक :- 14.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८१७४/२०२४**
**बोर्ड अ.क्र.४८**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.१
पोलीस,उप निरीक्षक, पोलीस स्टेशन केज, जि. बीड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.२
सह पोलीस अधिक्षक, उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, केज, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी वेगवेगळया तारखेला राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. प्रकाश शेळके, पीएसआय उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, केज, जि. बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४८ | ८१७४/२०२४ | २८.०५.२०२४ | दिलीप चंद्रमान गित्ते ब.नं. १३३७, डापकर ब.नं.९९६, नंदे पो. ना/१०३५, राजेश पाटील पोहनि केज, सारुक होमगार्ड,/१७९०, व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दि.१९.०६.२०२४रोजी आपण मागणी केलेली माहिती ही महिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(त्र) नुसार अनुदेय नाही असे कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून प्रथम अपिल निकाली काढलेले आहे. अपिलार्थी हे सतत माहितीचे अर्ज करतात. त्यामुळे कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण होत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहितीउपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१९.०६.२०२४ रोजी सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी घेतलेले निर्णय बरोबर असल्याचा निष्कर्ष काढून प्रथम अपील काढले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 9997 दिनांक :- 14.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०७१२ ते १०७१८/२०२४-०८**
**बोर्ड क्र.५० ते ५७ (एकूण ०८)**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप विभागीय अभियंता,
२ सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड
प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यकारी अभियंता, :
सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण आठ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ५० | १०७१२/२०२४ | ०५.०९.२०२४ | पर्यटन विकास अंतर्गत कामाचे प्र.मा. कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक, इ. निवीदा प्रणाली, कामाचा सध्यस्थिती अहवाल मिळणेबाबत. व इतर.. |
| ५१ | १०७१३/२०२४ | ०५.०९.२०२४ | शासकीय गोदाम, बीड नवीन इमारतीचे प्र.मा.कार्यारंभ आदेश अंदाजपत्रक इ माहिती मिळणेबाबत. |
| ५२ | १०७१४/२०२४ | ०५.०९.२०२४ | जिल्हा रुग्णालय, बीड येथील वाढीव २०० खाटांच्या रुग्णालय इमारतीबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५३ | १०७१५/२०२४ | ०५.०९.२०२४ | बीड येथील नवीन तसहील कार्यालय बांधकाम प्र.मा. कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक इ. निविदा यांची माहिती मिळणेबाबत. |
| ५४ | १०७१५ ऐ/२०२४ | ०५.०९.२०२४ | जिल्हाधिकारी कार्यालय नवीन कामाचे प्र. मा. कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक पहावयास दयावे व इ-निवीदा माहिती उपलब्ध करुन दयावी. |
| ५५ | १०७१६/२०२४ | ०५.०९.२०२४ | सार्वजनिक बांधकाम विभाग बीड येथील नवीन बांधकामाचे प्र.मा. कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक मिळणेबाबत. |
| ५६ | १०७१७/२०२४ | ०५.०९.२०२४ | शासकीय विश्रामगृह येथील नवीन बांधकामाचे आवश्यक कागदपत्र पाहावयास व छायांकित प्रत मिळणेबाबत. |
| ५७ | १०७१८/२०२४ | ०५.०९.२०२४ | बीड येथील सा.बां. विभाग परिसरात कचरा प्रक्रिया केंद्राचे बांधकाम करणे या कामाचे प्र.मा. अंदाजपत्रक, कार्यारंभ आदेश, मोजमाप पुस्तीका मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना विहित वेळेत माहिती देता आली नाही. कारण माझ्याकडे सा. बांधकाम उपविभाग बीड व सा. बांउपविभाग वडवणी येथील अतिरिक्त कार्यभार असल्यामेळे, अपिलार्थी हे सतत माहितीचे अर्ज सादर करतात. त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. तथापि अपूर्ण व चुकीची दिली असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल करतात.अपिलार्थी हे विस्तृत व्यापक स्वरुपाची माहिती मागतात.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर वेळोवेळी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणीवपुर्वक माहिती देण्यास टाळाटाळ करतात, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे आठ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9399 दिनांक : 07/08/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०७४४/२०२४**
**बोर्ड अ.क्र.५८**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
भांडार विभाग, नगर परिषद कार्यालय, बीड
२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल नगर परिषद, बीड श्री. भागवत प्रल्हाद जाधव व प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड, श्रीमती नीता अंधारे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ५८ | १०७४४/२०२४ | ११.०३.२०२४ | मा. जिल्हाधिकारी बीड यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.७ दि .३१.०३.२०२३ अन्वये नगर परिषद बीड अंतर्गत अग्निशामन साहित्य खरेदी करणेबाबत अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तीका, साहित्य खरेदी दरपत्रक, इ-निविदा याची परिपुर्ण माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०९.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, वीस पृष्ठांची माहिती दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०८.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन,जन माहिती अधिकारी, भांडार/अग्निशामक विभाग

यांनी १५ दिवसात नियमानुसार माहिती देण्याचे आदेशीत करुन, प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकरी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०८.१०.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल, नगर परिषद कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9998 दिनांक : 14.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०७४७ व १०७४८ /२०२४**
**बोर्ड क्र.६१ व ६२**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, नगर परिषद कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. प्रमोद सिद्राम माने, उप अभियंता, पा. पु. विभाग व प्रथम अपिलीय अधिकारी, श्रीमती निता अंधारे, मुख्याधिकारी, न.प.बीड, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ६१ | १०७४७/२०२४ | ११.०३.२०२३ | १५ व्या वित्त आयोगाचे निधीतून बीड नगर परिषद पाणी पुरवठा योजनेचे दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणेबाबत ७४,९८,५००/- रुपयास प्र.मा. दिली असून संचिकेसह परिपुर्ण व अंदाजपत्रक, खरेदी साहित्या दरपत्रक, मोजमाप पुस्तीका माहिती मिळणेबाबत |
| ६२ | १०७४८/२०२४ | ११.०३.२०२३ | बीड पाणीपुरवठा विभागाकरिता मनुष्यबळ पुरवठा करणे करीता १ कोटी रु. साठी दि.२४.०६.२०२१ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे याबाबत व १५ व्या वित्त आयोगाबाबत परिपुर्ण माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०९.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये,२८२ व २९१ पृष्ठांची माहिती पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी हे सारखे माहितीचे अर्ज करुन माहिती मागत असतात. त्यामुळे अपिलार्थी यांना वेळेत माहिती देता आलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिलावर दि.०८.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करुन, प्रथम अपिल निकाली काढले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाह केली जात आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१०.०७.२०२५ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 9999 दिनांक : 14.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०७४९/२०२४**
**बोर्ड अ.क्र.६३**

श्री. प्रतिक नवनाथ सरवदे, — अपिलार्थी
रा. महात्मा फुले नगर, धानोरा रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — :उत्तरवादी क्र.१
सहाय्यक नगर रचनाकार, नगर परिषद, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी अलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगर परिषद, बीड, श्री. दत्तात्रय शंकरराव तरोडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड, श्रीमती नीता अंधारे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ६३ | १०७४९/२०२४ | १०.१२.२०२३ | नगर परिषद बीड यांनी आरक्षीत केलेल्या भूखंडाची माहिती संचीका निहाय देण्यात यावी, तसेच काही आरक्षीत भूखंडावरील उठवलेले आरक्षण यांचीही संचिका निहाय माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. त्या अनुषंगाने त्यांना ५४२/- इतक्या रुपये भरुन माहिती घेऊन जाण्याबाबत दि.०९.०७.२०२५ रोजी Whatsapp द्वारे व दुरध्वनीद्वारे तसेच समक्ष सूचित केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी, नगर रचना विभाग यांनी १५ दिवसात नियमानुसार माहिती देण्याचे आदेशीत करुन, प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकरी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.१०.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल, नगर परिषद कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 10000 दिनांक : 14.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१२७७/२०२३**
**बोर्ड क्र.६४**

श्री. विजय नारायण शेळके, अपिलार्थी
रा. फलॅट क्र.३०३, समर्थ रेसिडेंसी, नेहरम इंग्लिश शाळेजवळ, सोमेश कॉनी, कलामंदिर मागे, नांदेड-४३१६०१.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी शहर नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.०२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.१०.२०२२ | मे. व्यंकटेश बिल्डर्स अँड डेवलपर्स चे भागीदार यांचेविरुध्द खालील व्यक्तीचे विरोधात भारतीय दंड संहिता, १८६० व महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, अनूसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८६ अन्वये गुन्हा नोंदवून घेऊन कायदेशीर कार्यवाही करणेबाबत या विषयाच्या माझ्या तक्रारीवबद्दल. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१७.११.२०२२ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे ३५ पृष्ठांची माहिती पाठविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१७.११.२०२२ रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8656 दिनांक :- 22/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६५३/२०२३**
**बोर्ड क्र.६५**

डॉ. दत्ताराम उध्दव राठोड, — अपिलार्थी
रा. पोलीस अधिक्षक, ना.ह.स. अमरावती, परिक्षीत बायोटेक,
बिल्डींग, बियाणी चौक, अमरावती-४४४ ६०२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक पोलीस निरिक्षक,
वाचक शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस उप अधिक्षक मुख्यालय,
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०८.२०२२ | तत्कालीन पोलीस अधिक्षक, नांदेड श्री विजय मगर यांची माहे जानेवारी २०२० ई-पत्रकाची प्रत वाचक शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय येथील साक्षांकित प्रत दयावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला चुकीची माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थांची वैयक्तिक माहिती मागितलेली असल्यामुळे. अपिलार्थी यांना दि.२२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये,

कलम ८(त्र) नुसार देता येत नाही असे कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, दि.२९.११.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती समाधानकारक दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व दि.२९.११.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, त्रयस्थांची वैयक्तिक स्वरुपाची माहिती असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५मधील कलम ८(१)(त्र) नुसार प्रथम अपिल फेटाळण्यात आलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8657 दिनांक : 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१७५२/२०२३**
**बोर्ड क्र.६६**

श्री. रामेश्वर आनंदराव आलेवाड, — अपिलार्थी
रा. घर न.२० पोलीस वसाहत पोलीस मुख्यालय समोर,
नांदेड-४३१६०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अपर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०९.२०२२ | मी डी एस आय एस/एपीयुआर येथे नेमणुकीस असताना दि.०८.०६.२०२१ रोजी माझ्यावर एसीबी ची कार्यवाही करण्यात आली असून यावरुन सी आर नंबर ४५/२१ क ७ ला लु प्र का गुन्हा दाखल आहे, वरील गुन्हयात पी एस इन्सपेक्टर येथे असलेले सीसीटीव्ही फुटेज आपण जप्त करण्यात आले आहे. दि.०१.०६.२०२१ चे १०.१० ते ११.४० व दि.०८.०६.२०२१ चे १५.२० ते १५.४० वाजेपर्यंत माझ्याशी संबंधीत असलेले फुटेज मिळणेस विनंती आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी

मागणी केलेली माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे उपलब्ध नाहीत. त्यामुळे सदरची माहिती देता येता येणे शक्य नाही, असे दि.०४.१०.२०२२ रोज च्यापत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचया प्रथम अपिलावर २०.१०.२०२२ राजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय आयोगास योग्य दिसून येत आहे. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२०.१०.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, सहायक संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नांदेड येथे परिक्षणकामी दाखल करण्यात आली आहे. सदर माहिती ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचेकडे उपलब्ध नसल्याने मागणी करण्यात आलेली माहिती देता येणे शक्य नाही, असा निर्णय पारित केलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांच्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8658 दिनांक :- 22/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -१८५४/२०२३**
**बोर्ड क्र.६७**

श्री. अशोक प्रभाकरराव मोरे, — अपिलार्थी
रा. किवळा, ता. लोहा, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक पोलीस निरिक्षक,
पोलीस स्टेशन सोनखेड, ता. लोहा, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, इतवार नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.१०.२०२२ | मा. पोलिस निरिक्षक साहेब पोलीस स्टेशन सोनखेड ता. लोहा, जि. नांदेड दि.११.०४.२०२२ रोजी आपल्या कार्यालयात पोस्टाने अर्ज आर एम सी रेल्वेस्टेशन पोस्टातून पाठविला आहे तर तो अर्ज आपल्या कार्यालयात कधी आला त्याची माहिती दयावी, मी दिलेल्या अर्जावर आजपर्यंत कोणकोणती कार्यवाही केली याचीपण माहिती देणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२४.१२.२०२२ रोजी सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या

प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.०१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी सदर माहितीची प्रत त्यांना व्यक्तिश: देणेबाबत आदेशीत केल्याचे दिसून येत आहे. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.**

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरिक्षक,पोलीस स्टेशन सोनखेड, ता. लोहा, जि. नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, इतवार नांदेड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8659 दिनांक : 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २०३१/२०२३**
**बोर्ड क्र.६८**

श्री. रामेश्वर आनंदराव आलेवाड, — अपिलार्थी
रा. घर नं.२० पोलीस वसाहत पोलीस मुख्यालय, समोर,
वजिराबाद, नांदेड-४३१६०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टशन इस्लामपूर,
ता. किनवट, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, किनवट, जि. नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सपोनिपोस्टे इस्लापूर, ता. किनवट, श्री. उमेश बालाजी भोसले उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.१०.२०२२ | दि.०१.०६.२०२१ ते १०.२० ते ११.३२ वाजेपर्यंत तसेच दि.०८.०६.२०२१ ते १५.२४ ते १५.३५ वाजेपावेतो पोलीस स्टेशन इस्लापूर येथील माझ्याशी संबंधीत असलेले डीव्हीआर मधील सीसीटीव्ही फुटेज मिळणेस विनंती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देता येत नाही दि.१५.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सदरचा गुन्हा हा लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड यांचेकडे तपासाला अल्याने आपण सदर कार्यालयाकडे अर्ज करावा असे कळविलेले आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कळविण्यात आलेले आहे.

*"आपल्या ज्या डि.व्ही.आर. मधील सी.सी.टी.व्ही.फुटेजची मागणी केली आहे. सदरचा डि.व्ही.आर. हा लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड यांनी पो. स्टे. इस्लापूर गुरन ४५/२०२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ चे गुन्हयामध्ये जप्त केलेला असून सिलबंद स्वरुपात पो.स्टे. इस्लापूर येथे जमा आहे. तसेच सदरचा गुन्हा हा लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड यांचेकडे तपासाला असल्याने आपण सदर कार्यालयाकडे अर्ज करावा."*

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२१.१२.२०२२ रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित केलेला आहे.

*"जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन इस्लापूर यांनी सदर अपिलकर्ता यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेचा अर्ज दि.३१.१०.२०२२ रोजी पोलीस स्टेशन इस्लापूर रोजी प्राप्त झाला असून अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जात नमूद माहिती ही सदरचा डि.व्ही.आर. हा लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय, नांदेड यांनी पो.स्टे.इस्लापूर गु.र.नं. ४५/२०२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ चे गुन्हयामध्ये जप्त केलेला असून सिलबंद स्वरुपात पो.स्टे.इस्लापूर येथे जमा आहे. तसेच सदरचा गुन्हा हा लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड यांचकडे तपासाला असल्याने आपण सदर कार्यालयाकडे अर्ज करावा. अशी लेखी माहिती अर्जदार यांना दि.१५.११.२०२२ रोजी देण्यात आली.*

*अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही पो.स्टे.इस्लापूर गु.र.न. ४५/२०२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ मधील पोलीस स्टेशन इस्लापूर येथील मुद्देमाल पावती क्रमांक०७/२०२१ चे अवलोकन केले असता तपासीक अधिकारी श्री. राहूल पखाले नेमणूक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांनी दि.१०.०७.२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नांदेड येथे पंचासमक्ष टेक्निशीयन यांचेकडून तपास कामी सी.सी.टी.व्ही. रेकॉर्डींग असलेले डी.व्ही.आर. ज्यात दि.०५.०७.२०२१ रोजी पंचासमक्ष "जप्त केलेल्या डी.व्ही.आर." मधील दिनांक ०८.०६.२०२१ रोजीचे फुटेज नवीन मेमरी कार्डमध्ये घेतले असल्यचे नमूद असल्याने व सदरची बाब ही मा. न्यायाचे आखत्यारीत येत असल्याने सदरची माहिती नाकारण्यात येत आहे. "*

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी चौकशी प्रक्रियेबाबत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचारकरता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२१.१२.२०२२ रोजी पारित केलेला आदेश कायम करण्यात येत आहे. या आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10001 दिनांक : 14.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१०६/२०२३**
**बोर्ड क्र.६९**

श्री. दापकेकर रामदास गणपतराव,
रा. सर्वे नं.५३८५८ दत्तचौक,
साईनाथनगर, वडगांव शेरी, पुणे-१४ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. एन. पी. नाटेकर, व. श्रे. लि.पो.अ.का.नांदेड व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. आर.बी. शेंडगे, पोलीस निरीक्षक, पो.अ.का.नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.११.२०२२ | ग्रा. प. दापका, गुं. रेकॉर्ड चोरी या विषयासंबंधात दि.१४.१०.२०२२ रोजी अर्ज केला होता, अर्जाची प्रत सोबत जोडल आहे, तथापि माझ्या अर्जावर कोणतीही समाधानकारक कार्यवाही करण्यात आलेली नाही, कृपया त्यासंबंधीत चार मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दि.२७.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.०१.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मोघम माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.१८.०१.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना देण्यात आलेली माहिती साक्षांकीत करुन देण्यात यावी. प्रकरणाचे निर्णयाअंती प्रथम अपील निकाली काढण्यात आले असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---1000 3--------- दिनांक :-14.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१०८/२०२३**
**बोर्ड क्र.७०**

श्री. दापकेकर रामदास गणपतराव, — अपिलार्थी
रा. सर्वे नं.५३/५८, दत्तचौक, साईनाथ नगर,
वडगांव शेरी, पुणे-१४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन मुक्रामाबाद, ता.मुखेड, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, देगलूर, जि. नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. शंकर धनाजीराव मोरे, पोउनि पोस्टे मुक्रामाबाद उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. गोपाळ दिगंबरराव सुर्यवंशी, पो.उनि, पोस्टे देगलूर, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.११.२०२२ | ग्रा. पं. दापकेकर गुं. रेकॉर्ड चोरी या विषयासंबंधात दि.२७.०९.२०२२ रोजी अर्ज केला होता,अर्जाची प्रत सोबत जोडत आहे. तथापि माझ्या अर्जावर कोणतीही समाधानकारक कार्यवाही करण्यात आलेली नाही कृपया त्या संबंधात इतर सहा मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीने अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मोघमपणेउत्तर देऊन दिशाभूल केली, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहित अधिकारी यांनी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.१२.२०२२ रोजी उपलब्ध माहिती विहित मुदतीत अपिलार्थी यांना पोष्टद्वारे दिलेली आहे. ही बाब योग्य ठरवून, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 10004 दिनांक: 14.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१६०/२०२३**
**बोर्ड क्र.७१**

श्रीमती सविता अशोक पवार — अपिलार्थी
रा. मलकागुडा तांडा, ता. माहुर, जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन माहूर, ता. माहूर, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, माहूर, जि. नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी, श्री. गणेश व्यंकटराव कराड, पोलीस निरीक्षक पो. स्टे. माहूर, जि. नांदेड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केलेली नाही.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०१.२०२३ | दि.०५.१२.२०२३ रोजी वेळ ५.३० वाजता पोलीस येऊन आम्हाला अटक करुन नेल्याचे अर्जाची किंवा एफ आय आर ची नक्कल व अटक वारंटची नक्कल मिळणेबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला अर्धवट माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०९.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, दि.०५.१२.२०२३ रोजी आपल्या विरुध्दात कोणत्याही प्रकारचा गुन्हा पोस्टे माहूर येथे दाखल नसल्याने एफ आय आर प्रतीची माहिती निरंक आहे. तसेच दि.०५.१२.२०२३ रोजी आपल्या विरुध्द दिलेल्या आर्जाची नक्कत सोबत जोडलेली आहे, असे कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी ते पत्र मिळाल्याचे मान्य केलेले आहे.

आज रोजी सुनाणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.०३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली अपुर्ण मिळाली असल्याचे अवगत आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10005 दिनांक : 14.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक २३७३/२०२३**
**बोर्ड क्र.७२**

सौ. मानसी गजेंद्र देशपांडे, — अपिलार्थी
रा. सिध्दनाथपुरी, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
पोलीस उप अधिक्षक (मु.),
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०४.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एन. पी. नाटेकर व. श्रे.लि.पो.अ.का.नांदेड उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. आर. बी. शेंडगे, पो. नि. पोलीस निरीक्षक, पो. अ. का. नांदेड, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.१०.२०२२ | पोलीस अधिक्षक कार्यालयातील कॅन्टीन, उपहारगृह तळ मजल्यावरील उर्जिता कॅन्टीन यांच्या चालक सौ. मानसी गजेंद्र देशपांडे यांच्या नावाने चालवण्याचा आदेश परिपत्र व भाडे या संबंधीचे कागदपत्र उपलब्ध करुन दयावे, कारण आजपर्यंत भाडयाबाबत कोणतेही कागदपत्रे आम्हाला दिले नाहीत ते उपलब्ध करुन दयावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२२.११.२०२२ रोजी दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.०१.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या सौ. मानसी गजेंद्र देशपांडे यांच्या नावाने कॅन्टीन चालविण्याचा आदेश व भाडे या माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन दयावे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक,पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेली देय होणारी माहिती, पुनश्च: एकदा आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. पोलीस उप अधिक्षक (मु.), पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10006 दिनांक : 14.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३२९६/२०२३**
**बोर्ड क्र.७३**

श्री. सनतकुमार मोखेडी कुन्हाडे,
रा. पट्टेदा (बु), ता.धर्माबाद, जि. नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन धर्माबाद, जि. नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, धर्माबाद, जि. नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.१२.२०२२ | मौजे पट्टेदा बु., ता. धर्माबाद येथील शंकर बाजीराव भायगावे रा. पट्टेदा, बु., याच्यावर पो. स्टेशन धर्माबाद येथे सन १९७५ ते डिसें.२०२२ पर्यत या व्यक्तिवर एकूण किती गुन्हे दाखल असलेले माहिती मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दि.३१.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, कलम ८(१)(त्र) अन्वये कळविल्याचे दिसून येत आहे. तसेच दि.२१.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, शंकर बाजीराव भायगावे, रा. पट्टेदा (बु.) ता. धर्माबाद यांचेवर सन १९७५ ते डिसेंबर २०२२ पर्यंत पोलीस स्टेशन धर्माबाद येथील अभिलेखावर एकूण (१) गुन्हा दाखल असल्याचे कळविल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०८.०३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पो.स्टेधर्माबाद यांनी अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती १० दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेशीत करुन प्रथम अपिल निकाली काढल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तथापि आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांना माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०८.०३.२०२३ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन धर्माबाद, जि. नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी,उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, धर्माबाद, जि. नांदेड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 10007 दिनांक :- 14.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३३५६/२०२३**
**बोर्ड क्र.७४**

श्री. रवि रामचंद्र कपीले, अपिलार्थी
रा. कदम लेआउट श्रीरामपूर पुसद,
ता. पुसद, जि. यवतमाळ

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन माहूर, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, माहूर, जि. नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०५.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. गणेश व्यंकटराव कराड, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन माहूर, जि. नांदेड, उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केलेली नाही.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.१२.२०२२ | मा. पोलीस निरीक्षक रिठे साहेब यांनी दि.१५.१०.२०२१ व दि.१६.०७.२०२१ रोजी दोन दिवस, संपूर्ण कोणती डयुटी केली त्याबाबत सीसीटीव्ही नोंदीसह दोन दिवसाची संपूर्ण माहिती दयावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, खोटी माहिती दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२८.०२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून अपिलार्थी यांचे प्रथम अपिल निकाली काढले असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10008 दिनांक : 14.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २९०५/२०२३**
**बोर्ड क्र.७५**

श्री. राजेश गोविंदराव बाबळीकर, — अपिलार्थी
रा. नाशिक सुतपत्र गृहनिर्माण सोसायटी, ए विंग, बिल्डींग, नं.१ रुम नं.९, धन्वंतरी क्लिनिक जवळ, ॲक्सिस बँक, एटीएम समारे, त्रिक्रोणी बंगला रोड, अयोध्यानगरी-१, अमृतधाम पंचवटी नाशिक, महाराष्ट्र-४२२००३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
भरोसा सेल,
महिला सहाय्यक कक्ष, पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस उप अधिक्षक (गृह),
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, पो. उपनिरीक्षक, भरोसा सेल नांदेड, श्रीमती स्नेहा सखाराम पिंपरखेडे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी , श्री. आर.बी. शेंडगे, पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०४.२०२३ | माझी पत्नी सौ. माहेश्वरी राजेश बाबळीकर उर्फ माहेश्वरी नारायण आलेवार हिने केलेल्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची सत्यप्रत देण्यात यावी, माझी पत्नी सौ. माहेश्वरी राजेश बाबळकर उर्फ माहेश्वरी नारायण आलेवार हिने दिलेले जबाब व त्यासोबत जोडलेले सर्व कागदपत्र व तिने केलेल्या सा-या तक्रारीचे सत्यप्रत अर्जासकट देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती गोपनीस असून कलम ८(१)(ङ) अन्वये नाकारण्यात येत आहे, असे अपिलार्थीस दि.०३.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीची आणि दिशाभूल निर्णय घेऊन माहिती देण्यास नाकारण्यात आले असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०३.०५.२०२३ रोजी सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०१.०६.२०२३ रोजी. सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी महीला सहायक कक्ष येथील उपलब्ध माहिती अर्जदार यांना देण्यात आली आहे. तसेच माहेश्वरी राजेश बाभळीकर यांनी दिलेल्या जबाब व तक्रारी अर्जाची माहिती माहिती अधिकार अधिनियम कलम (८)(ङ) अन्वये माहिती नाकारली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भूमिका योग्य ठरवून प्रथम अपिल निकाली काढल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता,अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 10009 दिनांक :- 14.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९३८/२०२३**
**बोर्ड क्र.७६**

श्री. सखाराम रघुनाथ कुलकर्णी, — अपिलार्थी
रा. दत्तविला सरपंचनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वजीराबाद, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप विभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,
उप विभाग, नांदेड शहर नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. उमाकांत वैजनाथ पुणे, ए.पी.आय. वजिराबाद पो.स्टे.नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.११.२०२२ | दि.०४ जुलै २०२२ ते आजपर्यंत या कालावधीतील दि.०४ जुलै २०२२ ला दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतीनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने चौकशी सुरु असल्यामुळे माहिती देता येत नाही, असे त्यांना दि.०५.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.०४.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी अर्जाच्या चौकशीबाबत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०४.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांनी माहिती मध्ये अर्जाची चौकशी चालू असल्याने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कलम ०८ (ज) प्रमाणे नाकारण्यात येत आहे, असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता, वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी चौकशी प्रक्रियापुर्ण झाल्यावर अपिलार्थी यांना नियमानुसार देय होणारी माहिती कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन दयावी, या निर्देशासह सदर द्वितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10010 दिनांक : 14.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४०६८/२०२३**
**बोर्ड क्र.७७**

श्री. कदम गिरीश विठ्ठलवराव — अपिलार्थी
मु. पो. गणपती मंदिरा जवळ,पुर्णा,
ता. पुर्णा, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन सोनखेड, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,
उपविभाग इतवार, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. विजयकुमार दत्ता कांबळे, एपीआय पी.एस. नांदेड ग्रामीण उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०३.२०२ | कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर इंदोर केटीआयएल या कपंनीचे हायवा टिप्परने शेख साजिद मृत्यू प्रकरणी श्री. विशाल भोसले ठाणेदार सोनखेड यांनी कंपनीला दिलेल्या पत्राची छायांकित प्रत व इतर दोन मुद्याबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.११.०४.२०२३ रोजीच्यापत्रान्वये, सदरचा गुन्हा पोलीस तपासावर असल्याने कलम ८(ज) प्रमाणे नाकारण्यात येत आहे, असे कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०३.०८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. आता सदर गुन्यात मा.कोर्टात दोषारोपत्र दाखल केले असून, अपिलार्थी यांना माहिती हवी असल्यास मा. कोर्टातून रितसर अर्ज करुन प्राप्त करुन घेऊ शकतात.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०३.०८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना सदरचा गुन्हा पोलीस तपासावर असल्याने माहिती नाकारली. मात्र सध्या सदर गुन्हयात मा. कोर्टात दोषारोपपत्र दाखल केले असल्याने अपिलार्थी यांना माहिती हवी असल्यास मा. कोर्टातून रितसर अर्ज करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे सूचित करुन, प्रथम अपील निकाली काढले आहे.

अत: अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेणे उचित ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 10011 दिनांक :- 14.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४४७५/२०२३**
**बोर्ड क्र.७८**

श्री. कन्हैया खंडेलवाल, — अपिलार्थी
रा. कापडगल्ली, हिंगोली

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक,
पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
वाचक पोलीस उप अधिक्षक,
पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि०७.०७.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०१.२०२३ | सन २०२० ते आजपर्यंत या कालावधीतील सोबत जोडलेल्या पत्रातील वाचा पोलीस उप महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे पत्र क्र.पो--/सपोनि-चिंचोलकर/कसुरी/२०२१/१२४० दि.१७.०३२०२१ बाबत संपूर्ण संचिका छायांकित प्रत करुन देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, विभागीय चौकशी सुरु असल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. तथापि विभागीय चौकशी पुर्ण होऊन दि.०७.०२.२०२३ रोजी अंतिम आदेश दिलेला असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती

अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०९.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०३.०४.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न पुरविता दिशाभूल करणारे पत्र दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय रद्दबातल करण्यात येत आहे. अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. वाचक पोलीस उप अधिक्षक, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय, नांदेड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 9400 ---------- दिनांक :- 07/08/2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४८७१/२०२३
बोर्ड क्र.७९

श्री. अब्दुल नासेर बासीद काजी, — अपिलार्थी
रा. औरंगपुरा, उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
जिल्हा कारागृह, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा कारागृह, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०३.०२३ | दि.०१.०१.२०२२ ते दि.३०.१२.२०२२ पर्यंत शासन/कारागृह प्रशासन मार्फत प्रापत बंदी कल्याण निधी व त्याचा वापर व खर्चाबाबतची सविस्तर माहिती व सत्यप्रत दयावी ही विनंती. व इतर एक मुद्याबाबत माहिती.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, बंदी कल्याण निधी या कारागृहास शासनाकडून प्राप्त झालेला नाही, याबाबत अपिलार्थी यांना तसे कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलावर दि.२३.०६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिशाभूल व अपूर्ण दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.०६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने वस्तुस्थिती नमूद करुन, प्रथम अपिली निकाली काढल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9401 दिनांक : 07/08/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४९२८/२०२४व ४९२९/२०२४**
**बोर्ड क्र.८० व ८१**

श्री. बबलुसिंघ केसरसिंघ लांगरी, — अपिलार्थी
मु. पो. कसारखेडा, ता.जि. नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन अर्धापूर, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहा. पोलीस अधिक्षक,
उप विभाग ग्रामीण, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०४.२०२३ | दि.२८.११.२०२२ रोजी मा. जिल्हा पोलीस अधिक्षक साहेब अधिक्षक कार्यालय, नांदेड येथे प्रमोद व्यंकट मुळे आणि हरीभाऊ रामेश्वरराव बाराट यांनी व इतर... |
| ३०.०९.२०२२ | कांदे बियाणे चोरी संदर्भात आणि नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेतील पैसा खोटया सहया व बनावटकागप पत्रे तयार करुन दिशाभूल व फसवणूक केलेल्या संदर्भात व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.२४.०१.२०२२ रोजी स्वत: सदर प्रकरणात माझी काही तक्रार नसून सदरचा अर्ज मी परत माघार घेत असल्याबाबत लेखी असल्यामुळे त्याच्या माहिती अर्जाच्याअनुषंगाने पुढील कारवाई केलेली नाही तसे अपिलार्थी यांना दि.२६.०४.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे पाठविण्यात आलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१५.०६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिलावर दि.१५.०६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य ठरवून प्रथम अपिल निकाली काढल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9402 दिनांक : 07/08/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५१७४/२०२३**
**बोर्ड क्र.८२**

श्री. केरबा नागोजी जेटावाड, — अपिलार्थी
रा. सिडको एन-डी-४२, डी-४, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वजीराबाद, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय वजीराबाद, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०४.२०२३ | दि.२८.०४.२०२३ रोजी ठिक ४.०० ते ४.३० वाजता दरम्यान मा. जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवक जावक विभाग व जिल्हाधिकारी कार्यालय मेन गेट मध्ये श्रीमती आशा पाडूरंग बिरकलेवाड महिला शिपाई व श्री. आलेवाड, श्री पांचाळ व सोनटक्के या पेलीस कर्मचाऱ्या समक्ष श्री कदम पोलीस शिपाई यांनी आर्वाच्य भाषेत आई बहिणीवर खालच्या स्तरावर शिवीगाळ केलेली आहे.अशी व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२०.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, कलम ८(त्र) अन्वये नाकारण्यात येत आहे असे दिलेले आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिश: पत्र स्वीकारुन दिनांक वेळ नमूद करुन दि.२६.०६.२०२३ रोजी पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 9403 दिनांक : 07/08/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४७६० डी/२०२३**
**बोर्ड क्र.८३**

श्रीमती लता धनाजीराव बिरादार, अपिलार्थी
रा. सदनिका क्र.३०१, ब्लॉसमन अप्पार्टमेंट, सर्व्हे नं.३८/४
मधुबन सोसायटी, बोवाडी, पुणे ४११ ०४५

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरिक्षक,
बिनतारी संदेश, पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
पोलीस उप अधिक्षक मुख्यालय पोलीस अधिक्षक कार्यालय,
नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केलेली नाही.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
| --- | --- |
| १५.०३.२०२३ | ०१ एप्रिल २०१७ ते जुलै २०२१ या कालावधीतील श्री. सुभाष पांडूरंग शिंदाळकर एएसआय, बि.सं.वि.नांदेड यांचे विषयीची पाच मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तिची माहिती मागितलेली होती. त्रयस्थ व्यक्तिने माहिती देण्यास आक्षेप नोंदविलेला आहे, तसे अपिलार्थीस दि.१०.०४.२०२३ रोजीच्यापत्रान्वये कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि२६.०६.०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, संपूर्ण माहिती मिळाली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.०६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखावरुन उपलब्ध माहिती तात्काळ विनामूल्य अर्जदारास उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय पारित केलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक,बिनतारी संदेश, पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. पोलीस उप अधिक्षक मुख्यालय पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9404 दिनांक : 07/08/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५९६४/२०२३**
**बोर्ड क्र.८४**

श्री. पंडीत मंगाजी सोनकांबळे, अपिलार्थी
रा. सुनिलनगर बळीरामपूर, पो. सिडको, नविन नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन ग्रामीण, नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधि ाकरी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय इतवार नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०३.२०२३ | पो. स्टे. नांदेड ग्रामीणच्या हद्दीतील हॉटेल लॉटरी, कॅरेम चहागाडे, मटन दुकाने इत्यादी व्यवसाय करणारे नाहरकत प्रमाणपत्र (एन ओ सी) व इतर दोन मुद्याबाब.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि.२०.०६.२०२३ रोजी माहिती मिळाली असून, माझी काहीही तक्रार नाही. त्यामुळे सदर अपील निकाली काढण्यात यावे अशी विनंती केली आहे. ते पत्र आयोगास सादर केले.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती

मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांना विचारणा केली असता ते याबाबत कोणतेही समर्थणीय कारण आयोगास देऊ शकले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 9405 दिनांक : 07/08/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६५५७/२०२३ ते ६५५९/२०२३-३**
**बोर्ड क्र.८५ ते ८७**

श्री. विठ्ठल महापुराव भोसले, — अपिलार्थी
रा. वर्षा बँक कॉलनी विक्रम नगर, लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंध विभाग, नांदेड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,लाप्रवि, नांदेड, श्रीमती अनिता चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०६.२०२३ | दि.०१.०६.२०२० ते दि.०५.०६.२०२३ या कालावधीतील उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय, शिवाजी नगर, लातूर येथे सध्या विविध पदावर कार्यरत असलेले सर्व अधिकारी कर्मचारी यांचे मूळ सेवा पटा मध्ये नावाचा तपशिलवार नोंद असलेल्या पहिल्या पानाची सत्यप्रत उपलब्ध करुन देण्यात यावी. |
| ०५.०६.२०२३ | दि.०१.०६.२०२० ते दि.०५.०६.२०२३ उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय, शिवाजी नगर लातूर येथे सध्या कार्यरत असलेले सर्व मागास वर्गीय अधिकारी, कर्मचारी आरक्षण कोठया मधून निवडलेले अशा अधिकारी, कर्मचारी यांचे मुळ जात जमाती प्रमाणपत्र व मा. समितीने वैधता प्रदान केलेले जाती जमीतीचे वैध प्रमाणपत्राच्या सत्यप्रत उपलब्ध करुन देण्यात यावी ही विनंती. |

| | |
|---|---|
| ०५.०६.२०२३ | दि.०१.०६.२०२० ते दि.०५.०६.२०२३ या कालावधीतील कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचे प्रथम नियुक्ती आदेश,पदोन्नती आदेश मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्याने माहिती अधिकार अधिनियम कलम ११ प्रमाणे देता येणे शक्य नाही असे तीन्ही माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०३.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीन्ही प्रथम अपिलावर दि.२७.०७.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागणी केलेली माहिती हेतुपरस्सर दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उघड केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे तीन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10012 दिनांक : 14.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६८९२/२०२३**
**बोर्ड क्र.८८**

श्री. मोहन किशनराव आसोरे, — अपिलार्थी
रा. समता विद्यालय शाळेजवळ, जयभिम नगर,
पो. शिवाजीनगर, ता.जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन हदगांव, जि. नांदेड-४३१७१२

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय,
उपविभाग, भोकर, जि. नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०६.२०२३ | आपले पत्र दि.०६.०६.२०२३ रोजीचे दि.०५.१२.२०२२ रोजी आपल्या पो. स्टे.ला पोस्टाद्वारे पाठवलेला अर्ज श्री चिंतले साहेब यांच्याकडे चौकशीसाठी देण्यात आला होता. चौकशीसाठी वैह लागत असल्यामुळे पो.ना/९०० श्री सातपुते साहेब यांच्याकडे देण्यात आल्याचे नमूद केले आहे. श्री सातपुते साहेब यांच्याकडे कोणत्या अभिलेखात त्या अर्जाची नोंद करण्यात आली कोणत्या तारखेला चौकशीसाठी अर्ज देण्यात आला त्या सर्व आदेशाची अभिलेख रजीस्टरची व मूळ अर्जाच्या संपूर्ण संचिकेची सत्य प्रतीत व लेखी स्वरुपात माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीचा अर्ज वर्ग करुन तोंडी आदेशानुसार अपिलार्थी यांना दि.१८.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, निकाल दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे युक्तिवाद करतात तथापि आयोगाच्या पटलावर पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने पुनश्च: एकदा अपिलार्थीस माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन हदगांव, जि. नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. सहायक पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, उपविभाग, भोकर, जि. नांदेड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10152 दिनांक : 22.08.2024

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६८९३/२०२३**
**बोर्ड क्र.८९**

श्री. मोहन किशनराव आसोरे, — अपिलार्थी
रा. समाता विद्यालय शाळेजवळ, जयभिम नगर,
पो. शिवाजी नगर, ता.जि. नांदेड-४३१६०२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन शिवाजी नगर, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, उपविभाग वजीराबाद नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. किशोर गावंडे, पी.एस.आय. पो.स्टे. शिवाजीनगर, नांदेड उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. उमाकंत वैजनाथ पुणे,ए.पी.आय. वजिराबाद पो.स्टे.आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०६.२०२३ | आपल्या पो.स्टे.ला दि.१०.०८.२०२२ रोजी दिलेल्या तक्रारी अर्जातील विषयानुसार कुठल्याही प्रकारचा गुन्हा घडत नाही असे आपल्या पो स्टे च्या अधिकाऱ्याचे म्हणने आहे सदरील विषयानुसार (एफ आय आर, एन सी आर) दाखल करता येत नाही तर तसे लेखी पत्र दयावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अर्जावर काहीच चौकशी झालेली नाही. माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी

केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.३०.०६.२०२३ रोजी तसेच दि.१८.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी तशी पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, निकाल दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांनी मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा बोध होत नाही. अशा स्वरुपाची माहिती कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत समावेश होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती संदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 10013 दिनांक :- 14.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७१११/२०२३**
**बोर्ड क्र.९०**

श्री. सोमेश मारोतीराव कलेटवाड, अपिलार्थी
रा. नाटकर गल्ली, व्यंकटेश पुज्जलवार यांचा वाडा, देगलूर,
ता. देगलूर, जि. नांदेड-४३१ ७१७.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
वाचक पोलीस उप अधिक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, सौ. वाय. एस. वाघमारे, कार्यालय अधीक्षक, पोउपमनि कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. श्रीराम माचेवाड, सहा.पोलीस निरीक्षक, पोउपमनि कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०६.२०२३ | दि.०६.०३.२०२३ चा अर्ज प्राप्त झाल्यापासून ते मे २०२३ या कालावधीतील अर्जदार मारोती लच्छमना कलेटवाड यांनी मा. श्री. रामदास आठवले सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दि.१०३/२०२३ रोजी दिलेल्या अर्जाची मा. अप्पर पोलीस अधिक्षक नांदेड यांनी चौकशी करुन मा. आय जी यांनी सादर केलेल्या अहवालाची प्रत अर्ज चाक्शीत घेतलेले सर्व जवाब कागदपत्रे व संपूर्ण अर्ज चौकशीची संचिका व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१२.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती ही, महिती अधिकार अधिनियम,२००५चे कलम ८ (१) (छ), (ज) मधील तरतुदीनुसार नाकारण्यात येत आहे, असे कळविलेले आहे. सद्यस्थितीत चौकशी पुर्ण होऊन निर्णय अंतिम झालेला नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२०.०९.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळण्यात येत आहे, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीचा व बेकायदेशीर आदेश पारित केल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये चौकशी प्रकरणाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. चौकशीची प्रक्रिया पुर्ण होऊन अद्याप निर्णय अंतिम झाला नसल्यास अशी माहिती कलम ८(१)(ज) नुसार देय होणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान युक्तिवादात असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील प्रकरणात अद्याप निर्णय अंतिम झालेला नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 10014 दिनांक :- 14.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७६४७/२०२३**
**बोर्ड क्र.९१**

श्री. सोमेश मारोतीराव कलेटवाड, — अपिलार्थी
रा. नाटकर गल्ली, व्यंकटेश पुज्जलवार यांचा वाडा, देगलूर,
ता. देगलूर, जि. नांदेड-४३१७१७.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन देगलूर, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, देगलूर, जि. नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळांवरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. गोपाल दिगंबर सुर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक पी एस देगलूर, व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. शंकर धनाजीराव मोरे, पोउपनि पोस्टे मुक्रमाबाद उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०६.२०२३ | दि.२२.०१.२०२३ पासून दि.३०.०५.२०२३ या कालावधीतील मी सोमेश मारोतीराव कलेटवाड रा देगलूर दि.२३.०१.२०२३ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने केलेली चौकशी पाठवण्यात आलेल्या नोटीसा समजपत्र घेण्यत आलेले जबाब स्टेशन डायरी नोंदीच्या प्रती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.३०.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र माहितीचा

अधिकार अधिनियम-२००५ कलम ३(क) अन्वये एक विनंती अर्ज केवळ एका विषयाशी संबंधीत असावा असे नमूद आहे. आपण दिलेल्या अर्जात अनेक विषयाची माहिती मागितली आहे. आपणास पहिल्या विषयाची माहिती देण्यात येत असून इतर विषयाची माहितीकरीता वेगळा अर्ज करावा असे कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३०.०८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती नाकारल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी चौकशी प्रक्रिये संबंधीत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने पहिल्या विषयाची माहिती दि.३०.०६.२०२३ रोजी दिल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३०.०८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांनी मागीतलेली माहिती एका वेळी एका मुद्याचा अर्ज सादर करुन माहिती मागवावी अनेक मुद्याची माहिती एकाच अर्जात मागीतल्यामुळे आपणास माहिती अधिकारी अधिनियम कलम ८ (ज) प्रमाणे माहिती नाकारण्यात येत आहे, असा निष्कर्ष काढून अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10015 दिनांक :- 14.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७६४८/२०२३**
**बोर्ड क्र.९२**

श्री. सोमेश मारोतीराव कलेब्बाड, — अपिलार्थी
रा. नक्कर गल्ली, व्यंकेश पुज्जलवार यांचा वाडा, देगलूर, ता. देगलूर, जि. नांदेड-४३१ ७१७

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.१
अविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कंधार, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.२
उविभागीय पोलीस अधिकारी,
उविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कंधार, जि. नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. आर. एच. केदार, सपोनि उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कंधार, जि. नांदेड, उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. आर.बी. शेंडगे, पोलीस निरीक्षक,नियंत्रण कक्ष, नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०६.२०२३ | सोमेश मारोतीराव कलेब्बाड दि.२५.११.२०२३ रोजी मा. प्रधान सचिव ग्रामविकास महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे दिलेल्या अर्जाची चौकशी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री मारोती साहेब यांनी केली असून अर्ज चौकशीत पाठवण्यात आलेल्या संपूर्ण नोटिसा अर्जचौकशीत घेण्यात आलेले जबाब कागदपत्रे, चौकशीचा व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२०.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, आपणास हवी

असलेली माहिती ही नेमकी पोस्टाने हवी किंवा प्रत्यक्ष माहिती हवी आहे याचा स्पष्टउल्लेख करण्यात आली नाही. तरी आपणास हवी असलेली माहिती ही इकडील कार्यालयास हजर राहून माहिती प्राप्त करुन घ्यावे असे नोंदणीकृतट्पालाद्वारे कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती पोस्टाने न दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणा युक्तिवाद व उलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१९.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२०.०९.२०२३ रोजी नोंदणीकृत पत्रान्वये दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद कायम करण्यात येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.१०.०७.२०२५ रोजीच्या निवेदनात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.- 10016 दिनांक :- 14.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७६८३/२०२३**
**बोर्ड क्र.९३**

श्री. सोमेश मारोतीराव कलेटवाड, — अपिलार्थी
रा. नाटकर गल्ली, व्यंकटेश पुज्जलवार यांचा वाडा, देगलूर,
ता. देगलूर, जि. नांदेड-४३१ ७१७.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक पोलीस निरीक्षक,
वाचक पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस उप अधिक्षक मुख्यालय,
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री. महादेव पुरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक, वाचक अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड, उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. आर.बी. शेंडगे, पो.नि.पो.नियंत्रण कक्ष, नांदेड, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०६.२०२३ | दि.०६.०३.२०२३ ते दि.३१.०५.२०२३ या कालावधीतील अर्जदार मारोती लचछमन्ना कलेटवाड यांनी मा. श्री. रामदास आठवले सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिलेल्या अर्जाचे चौकशी मा. अप्पर पोलीस अधिक्षक नांदेड यांनी करुन मा. आय जी साहेब नांदेड यांना अहवाल सादर केला आहे सदर अर्जाच्या चौकशीत घेण्यात आलेले संपूर्ण जबाब व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२२.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, सदर अर्ज चौकशी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परीक्षेत्र नांदेड यांचे कार्यालयाकडे पुढील आदेशास्तव प्रलंबीत असल्यने सदर प्रकरणी आपण मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे कार्यालयाशी संपर्क साधवा असे सविस्तरपणे कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थीस यांना दि.११.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, २४९ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२८.०८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट, चुकीची विनाशिक्के माहिती वा विना अधिकारिक पत्र न देता व्यक्तिश: माहिती मागितली असता पोस्टाने माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२२.०६.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, आदेशीत केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.०९.२०२३ रोजी पोस्टाने माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात व अपिलार्थी यांच्या दि.१०.०७.२०२५ रोजीच्या विनंती अर्जात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 10017 दिनांक :- 14.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७३९२/२०२३**
**बोर्ड क्र.९४**

श्री. शेख नईम शेख लाल, — अपिलार्थी
रा. नविन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली,
ता.जि. हिंगोली, मो.नं.८९९९८८०४५१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
वाचक, पोलीस उप अधिक्षक विशेष पोलीस महानिरीक्षक
कार्यालय, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, पोउपमनि., कार्यालय नांदेड परिक्षेत्र नांदेड, सौ. वाय. एस. वाघमारे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. श्रीराम माचेवाड, सहा. पोलीस निरीक्षक, पोउपमनि, कार्यालय नांदेड परिक्षेत्र नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०९.२०२३ | दि.०१.०१.२००० पासुन ते आजपर्यंत या कालावधीतील पोलीस स्टेशन येथे तक्रारीवरुन गुन्हा नोंदणी होऊन त्याची तपास करुन दोषारोपपत्र तयार करुन मा. न्यायालयात दाखल करण्यात येते. सदर गुन्हयामध्ये मा. न्यायालयाने दोषमुक्त/ निर्दोष सुटका झाल्यानंतर संबंधितावरील गुन्हयाची नोंद कोणत्या शासकीय नियमाच्या कायद्याच्या कोणत्या तरतुदीप्रमाणे पोलीस स्टेशनच्या गुन्हा रजिस्टरमध्ये नोंद कायम ठेवण्यात येत आहे. त्या शासकीय नियमाची कायद्याची किंवा यासंबंधी मा. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय किंवा इतर न्यायालयाच्या आदेशाची/ मार्गदर्शक सुचनांची माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचे माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२८.०९.२०२३ रोजीच्यापत्रान्वये, मागणी केलेली माहिती अभिलेखावर उपलब्ध नाही, असे कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०२.११.२०२३ रोजी सुनवणी घेऊन, निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही गुन्हयाच्या तपासाबाबतची आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०२.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांनी दि.०७.०९.२०२३ रोजी माहिती अधिकार अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही पोलीस नियमावली भाग-२, परिशिष्ट-१५ मधील नियम क्र.२६२ अन्वये अभिलेख जतन करण्यासाठीची असून सदरची पोलीस नियमावली ही गोपनिय स्वरुपाची असल्याने त्याच्या छायांकित प्रती पुरविता येणार नाही, असा निष्कर्ष काढून अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 10018 दिनांक :- 14.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४७७/२०२३**
**बोर्ड क्र.९८**

श्री. मोहम्मद खलीलोद्दीन माहेम्मद जैनोद्दीन, — अपिलार्थी
रा. घन क्र.९-६-११८२,गोल्डन बेकरी जवळ,रहेमत नगर, नांदेड, ता.जि. नांदेड-४३१६०४

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहसंचालक,
उच्च शिक्षण, विभागीय सहसंचाक उच्च शिक्षण कार्यालय, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहसंचालक,
उच्च शिक्षण,
विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.११.२०२२ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये द्वितीय वर्षाची पहिला व दुसऱ्या हप्त्याची राजश्री छत्रपती शाहू महाराष्ट्र शिक्षण स्किम शिष्यवृत्ती माहिती व इतर दोन मुद्याबाबत माहिती.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांन त्रयस्थांची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांना विचारणा केली असता ते याबाबत कोणतेही समर्थणीय कारण आयोगास देऊ शकले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10019 दिनांक : 14.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९४९/२०२३**
**बोर्ड क्र.९९**

डॉ. दिगंबर रामराव मोरे, — अपिलार्थी
रा. चिकणेकरांचा वाडा घर क्र.२-४८८,
पानसरे चौक, कॉलेज रोड, धर्माबाद-४३१८०९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण, व्हीआयपी रोड,
आनंद नगर रोडवर दत्त मंदिरजवळ दयानंद नगर, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण व्ही आय पी रोड, आनंद नगर रोडवर दत्त मंदिरजवळ दयानंद नगर, नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.१२.२०२२ | दि.२२ नोव्हेंबर २०२२ ते दि.२८ डिसेंबर २०२२ पर्यंत या कालावधीतील धर्माबाद शिक्षण संस्था संचलित, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या प्राचार्य पद भरतीबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अर्धवट दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०३.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांचे प्रथम अपिल अमान्य केले, असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला खारीज करण्यात येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांच्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण व्ही आय पी रोड, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10153 दिनांक : 22.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७१६७/२०२३**
**बोर्ड क्र.१००**

श्री. आवाळे विठ्ठल हणमंतराव, — अपिलार्थी
रा. तिर्थरुप निवास, भक्ती नगर, साई रोड, आर्वी, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
विभाग प्रमुख,
उपयोजित यंत्रशास्त्र शासकीय तंत्रनिकेतन श्री. सावरकर मार्ग
बाबा नगर, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकतन श्री. सावरकर मार्ग बाबा नगर,
नांदेड

**(सुनावणी दिनांक १४.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०४.२०२३ | दि.०१.०४.२००३ ते ३१.०३.२०२२ या कालावधीतील संस्थेतील सर्व विभागचे चाचणी शुल्क आणि त्रयस्थ तांत्रिक तपासणी मानधनाच्या वाटपाबाबतचे कार्यालयीन आदेशाची छायांकित प्रती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्काचा भरणा केल्यानंतर दि.३०.०५.२०२३ रोजी अर्धवट प्राप्त झालेली आहे. तथापि फिस मात्र पुर्ण भरुन घेतलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीच्या पध्दतीने जादा शुल्क भरुन घेतलेली असून अद्यापपर्यंत मला परत केलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अर्धवट माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१०.०५.२०२३ रोजी शुल्क कळविल्याचे दिसून येत आहे. तदनंतर अपिलार्थी यांनी परिपुर्ण शुल्काचा भरणा केल्यांनतरही अर्धवट माहिती टपालाद्वारे दि.३०.०५.२०२३ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी नमूद केले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२२.०८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी घेतलेले निर्णय बरोबर असल्याचा निष्कर्ष काढून अपील नाकारुन उर्वरित रक्कम श्री. आवाळे विठ्ठल हणमंतराव यांना अदा करावे असा आदेश पारित केला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेश कायम करण्यात येत आहे. या आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख,उपयोजित यंत्रशास्त्र शासकीय तंत्रनिकेतन श्री. सावरकर मार्ग बाबा नगर, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (पुनश्च: एकदा) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, उपयोजित यंत्रशास्त्र शासकीय तंत्रनिकेतन श्री. सावरकर मार्ग बाबा नगर, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार उर्वरित रक्कम श्री. आवाळे विठ्ठल हणमंतराव यांना अदा करण्यात यावे.

३. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकतन श्री. सावरकर मार्ग बाबा नगर, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---10020--- दिनांक :---14.08.2025